RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक २०(३)] सोमवार, ऑक्टोबर १४, २०२४/आश्विन २२, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.—** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | १-४ |


**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४.

MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2024.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५८ चा ६०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— १९५८ चा ६०.

(१) अनुच्छेद ४ मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) अनुच्छेद ५ मध्ये, खंड (ह) मधील, उप-खंड (ब) मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) अनुच्छेद ८ मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) अनुच्छेद ९ मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) अनुच्छेद १० मध्ये, स्तंभ (२) मधील, “५०,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भाग भांडवलावर ०.२ टक्के ” या मजकुराऐवजी, “एक कोटी रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भाग भांडवलावर ०.३ टक्के ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(६) अनुच्छेद १२ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

“ **१२. निवाडा,** म्हणजे, दावा चालू असताना, न्यायालयाच्या आदेशाव्यतिरिक्त अन्यथा केलेल्या निर्देशावर, विद्यमान किंवा भावी विवाद लवादाकडे सादर करण्या-विषयीच्या लेखी करारनाम्याच्या परिणामी दिलेला निवाडा असणारा, परंतु, वाटणीचा निदेश देणारा निवाडा नसणारा,—

| | |
|---|---|
| (अ) स्थावर मालमत्तेशी संबंधित असणारा ; | अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अभिहस्तांतरणपत्रावर जे आकारण्यायोग्य असेल तितके शुल्क. |
| (ब) (एक) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत; | निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.७५ टक्के. |
| (दोन) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत ; | रुपये सदतीस हजार पाचशे *अधिक* निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.५ टक्के. |
| (तीन) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, | रुपये दोन लाख बासष्ट हजार पाचशे *अधिक* निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.२५ टक्के.”; |

जंगम मालमत्तेशी संबंधित असणारा, लवादाने किंवा पंचाने दिलेला कोणताही लेखी निर्णय, होय,

(७) अनुच्छेद २७ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपयांच्या " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपयांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(८) अनुच्छेद ३० मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(९) अनुच्छेद ३८ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१०) अनुच्छेद ४४ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(११) अनुच्छेद ४७ मध्ये, खंड (१) मधील, उपखंड (ब) मध्ये, स्तंभ (२) मधील, " पंधरा हजार " या मजकुराऐवजी, " पन्नास हजार " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१२) अनुच्छेद ४९ मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१३) अनुच्छेद ५० मध्ये, स्तंभ (२) मधील, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१४) अनुच्छेद ५२ मध्ये, खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१५) अनुच्छेद ५८ मध्ये, खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१६) अनुच्छेद ६३ मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, स्तंभ (१) मध्ये, " दहा लाख " या मजकुराऐवजी, "पाच लाख" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील,—

(क) स्तंभ (१) मध्ये, " दहा लाख " या मजकुराऐवजी, " पाच लाख " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) स्तंभ (२) मध्ये, " दहा लाख रुपयांवरील रकमेच्या ०.१ टक्के " या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपयांवरील रकमेच्या ०.३ टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन

मुद्रांक शुल्क बसविण्यात सुलभता व एकरुपता आणण्याच्या आणि शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यास जोडलेल्या अनुसूची एक च्या विवक्षित अनुच्छेदांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

२. उक्त अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) अनुच्छेद ४,५,८,९,२७,३०,३८,४४,४९,५०,५२, व ५८ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित संलेखांवरील शंभर रुपये किंवा दोनशे रुपये इतक्या नाममात्र रकमेतील दीर्घ काळापूर्वी निश्चित केलेल्या मुद्रांक शुल्कांच्या दरात पाचशे रुपयेइतकी वाढ करणे ;

(दोन) अनुच्छेद १० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कंपनी संस्थापन नियमावलीच्या संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या दरात व मुद्रांक शुल्काच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे ;

(तीन) अनुच्छेद १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लवादाने दिलेल्या निवाड्याच्या संलेखावरील मुद्रांक शुल्कांच्या दरात वाढ करणे ;

(चार) जेव्हा अनुच्छेद ४७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रोख रकमेच्या स्वरुपात आणलेला अंशदानाचा हिस्सा, ५०,००० रुपयांहून अधिक असेल त्याबाबतीत, भागीदारीच्या संलेखावरील मुद्रांक शुल्कांच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे ;

(पाच) अनुच्छेद ६३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यकंत्राटाच्या संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या दरात व मुद्रांक शुल्काच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ ऑक्टोबर २०२४.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.